मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत



# आवडता
# मुलगा गुलाम
# बनतो

लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: Byron Unger; Lazarus

रूपान्तरकार: M. Kerr; Sarah S.

अनुवादक: Rev. Shilas Gavit



निर्माता: Bible for Children
www.M1914.org



©2014 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

इसहाक फार आनंदित होता. कारण त्याचा मुलगा याकोब घरि परतला होता. ऐवढेच नव्हे तर ज्या एसावाने याकोबाला मारण्याचा निश्चय केला होता त्याने देखिल त्याचे स्वागत केले. परंतु याकोबाचे मुले आनंदित नव्हते कारण त्यांचा सर्वात लहान भाऊ योसेफ हा वडीलांचा आवडता होता.



योसेफाने जेंव्हा त्याचे स्वप्न त्याच्या भावांना सांगितले तेंव्हा तर त्याच्या भावांना त्याचा जास्ती राग आला. "आपण शेतात पेंढ्या बांधीत होतो तो माझी पेंढी उठून उभी राहिली; तेंव्हा तुमच्या पेंढ्या माझ्या पेंढीसभोवती येऊन उभ्या राहिल्या व त्यांनी तिला नमन केले." असे योसेफाने त्यांना सांगितले. या स्वप्नाचा अर्थ असा की योसेफ त्याच्या भावांपेक्षा जास्त महत्वाचा होईल.



योसेफाच्या दुसऱ्या स्वप्नात, सूर्य, चंद्र व अकरा तारे यांनी त्याला नमन केले असे दिसले. त्याचे आईवडील व भाऊ यांच्यापेक्षा स्वतःला जास्त महत्व दिल्यामुळे योसेफावर त्याचे वडील देखिल रागावले.



एके दिवशी याकोबाने योसेफाला त्याच्या भावांकडे शेतात जेथे ते कळप चारावयास गेले होते तिकडे पाठविले. त्याच्या भावांनी त्याला त्यांच्याकडे येतांना पाहिले. "चला या स्वप्नदर्शीला आपण मारुन टाकू" असे ते आपसांत म्हणाले म्हणाले. योसेफाला त्याच्यासमोरिल धोका माहित नव्हता.



त्यांचा मोठा भाऊ रऊबेन हा त्यांच्याशी सहमत नव्हता. तो म्हणाला, "आपण रक्तपात करु नये, पहा येथे एक खड्डा आहे. याला आपण त्यात मरायला टाकून देऊया!" रात्रीच्यावेळी तेथे जाऊन त्याला त्या खड्ड्यातून सोडवावे अशी रऊबेनची योजना होती.



योसेफ आपल्या
भावांपाशी पोहंचला,
तेंव्हा त्याच्या अंगात
याकोबाने त्याच्या
आवडत्या मुलासाठी खास
तयार केलेला रंगेबिरंगी
पायघोळ झगा होता तो
त्यांनी ओरबाडून काढला.
मग त्यांनी त्याला त्या
भयाण अशा खड्ड्यात
टाकून दिले.



रऊबेनच्या अनुपस्थितीत, उंटाचा तांडा त्यांच्याजवळून मिसर देशात जात असलेला त्यांनी पाहिला. तेंव्हा यहुदा आपल्या भावांस म्हणाला, "चला योसेफाला विकून टाकू." सौदा पक्का केला. त्यांनी योसेफाची विस चांदीच्या नाण्यांनी विक्री केली.





प्रवाशी उंट त्याला त्याच्या कुटुंबापासून व मातृभूमिपासून दुर घेऊन जात असतांना घाबरलेला आणि डोळ्यांत अश्रू असलेला योसेफ, असहाय्यतेने पहात होता.





"हा योसेफचाच झगा आहे
काय? हा रक्ताने माखलेला
आहे. आम्हांला तो रानात
मिळाला." त्याचा प्रीय मुलगा
योसेफ याला रानातील हिंस्त्र
पशूंनी मारुन टाकले असावे
यावर त्या क्रूर भावांनी
याकोबाला विश्वास करण्यास
भाग पाडले. याकोबाने आपले
कपडे फाडले व शोक केला.
कोणीही त्याचे सांत्वन करु
शकले नाही.



मिसरांत, योसेफ घाबरलेला आणि एकटाच असा असणार. कदाचित त्याला घराची आठवण येत असावी. परंतु आता त्याची तेथून सुटका होऊ शकत नव्हती. तो मिसरांतील पोटीफर नावाच्या एका महत्वाच्या अधिकाऱ्याच्या घरात गुलाम होता. योसेफ हमेशा मेहनत करुन काम करतो व तो विश्वास करण्यास योग्य आहे हे पोटीफरने पाहिले.

एके दिवशी पोटीफराने योसेफाला सांगितले की, "परमेश्वर तुझ्याबरोबर असल्याकारणाने जे कांहि तूं हाती घेतो त्यास परमेश्वर यश देतो. म्हणून तू माझ्या घराचा कारभारी व्हावे, माझा व्यवसाय आणि माझ्या इतर सेवकांचा प्रमुख व्हावे अशी माझी इच्छा आहे."



योसेफामुळे देवाने पोटीफरचे घरदार व शेतीवाडी या सर्वांचे कल्याण केले. योसेफ आता एक महत्वाचा मनुष्य बनला असतांना देखिल तो देवावर भरोसा करुन विश्वासूपणे देवाची सेवा करत होता. परंतू यासेफावर एक संकट आले.



पोटीफरची पत्नी दुष्ट होती. तिच्या पतीची जागा योसेफाने घ्यावी असे तिने योसेफाला सांगितले. योसेफाने तसे करण्यास नकार दिला. पोटीफर विरुध्द् वागून तो देवाविरुध्द् पाप
करु शकत नव्हता.



जेंव्हा त्या स्त्रीने त्याच्याशी बळजबरी करण्याचा प्रयत्न केला, तेंव्हा तो तेथून पळून गेला. पण योसेफ पळून जातांना त्याचे एक वस्त्र तिच्या हाती राहिले.



"तुमच्या गुलामाने माझ्यावर बळजबरी केली, पाहा येथे त्याचे वस्त्र आहे!" अशी पोटीफरच्या पत्नीने तक्रार केली. पोटीफरला राग आला. त्याची पत्नी खोटे बोलत आहे हे कदाचित त्याला माहित असावे. परंतु त्याला काहीतरी करणे आवश्यक होते. त्याने काय केले असेल बरे?




पोटीफरने योसेफाला तुरुंगात टाकले. जरी
तो निर्दोष होता, तरी योसेफाच्या मनात
कडूपणा किंवा राग नव्हता. कोणत्याही
परिस्थितीत तो असो – तुरुंगात का असेना,
पण काहीही झाले तरी जर देवाचा
सन्मान केला, तर देव त्याचा सन्मान करिल
हि गोष्ट कदाचित तो या कठिण प्रसंगातून
जातांना शिकत असावा.

आवडता मुलगा गुलाम बनतो

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

उत्पत्ति ३७, उत्पत्ति ३९

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे.

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगा:
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि परमेश्वराशी रोज बोला! योहान 3:16